**प्रसिध्दी पत्रक** दिनांक 29/08/2025

आरोपी खाजगी इसम सांडु नारायण शेलार, वय 46 वर्ष ,व्यवसाय - प्रॅापर्टी एजंट रा. प्लॉट नं. 142, समतानगर, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांची प्लॉटची रजिस्ट्री करुन देण्यासाठी 70,000/- (सत्तर हजार) रुपये लाचेची मागणी करून खाजगी इसम यांनी पंच समक्ष 58,000/- रुपये स्विकारल्याने खाजगी इसम लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे सिल्लोड ( शहर ), छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | **खाजीग इसम** - सांडु नारायण शेलार, वय 46 वर्ष ,व्यवसाय - प्रॅापर्टी एजंट रा. प्लॉट नं. 142, समतानगर, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागणी रक्कम | 70,000/- (सत्तर हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | 58,000/- (अठ्ठावण्ण हजार रुपये) |
| सापळा अधिकारी | श्री. केशव दिंडे, पोलीस निरिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांच्या खरेदी केलेल्या प्लॉटची रजिस्ट्री करुन देण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | दिनांक 29/08/2025 रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची शासकीय पंच समक्ष खाजगी इसम शेलार यांच्याकडे तक्रारदारास पाठवून पडताळणी केली असता खाजगी इसम यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांनी खरेदी केलेल्या प्लॉटची दुय्यम निबंधक कार्यालय सिल्लोड यांच्याकडुन रजिस्ट्री करुन देण्यासाठी स्वत:साठी 58,000/- रुपये (अठ्ठावण्ण हजार रुपये) व शासकीय चलन 10,000/- (दहा हजार रुपये) लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>लाच मागणी पडताळणी नंतर आजच दिनांक 29/08/2025 रोजी शासकीय पंच समक्ष मार्केट यार्ड, बिल्डींग सिल्लोड या ठिकाणी सापळा कारवाई आजमावली असता खाजगी इसम यांनी तक्रारदार यांच्याकडून 58,000/- (अठ्ठावण्ण हजार रुपये) रुपयांची लाचेची रक्कम पंचा समक्ष स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.<br>सबब खाजगी इसम शेलार यांच्या विरोधात पोलीस ठाणे सिल्लोड शहर, छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण ) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असुन नमुद खाजगी इसम यांना अटक करुन तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मार्फत करण्यात येत आहे. |

सदर कार्यवाही श्रीमती माधुरी कांगणे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर, अपर पोलीस अधीक्षक शशीकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक श्री.सुरेश नाईकनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरिक्षक, श्री. केशव दिंडे यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोलीस हवलदार अशोक नागरगोजे, पोअ/विलास चव्हाणा, चालक सी.एन.बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in
2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205
पोलीस उप अधीक्षक :- 9923247986

पोलीस उप अधीक्षक कार्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

सुरेश ह.नाईकनवरे
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
छत्रपती संभाजीनगर